# शेतमालाला हमीभाव दिल्याशिवाय आत्महत्या कमी होणार नाहीत

पुणे, दि. १८ (प्रतिनिधी) - आडते, व्यापारी आणि इतर मध्यस्थांमुळे आपल्याच शेतमालाची किंमत शेतकऱ्याला ठरविता येत नाही, तो केवळ केविलवाण्या नजरेने व्यापाऱ्यांकडे पाहत राहतो. उत्पादन प्रक्रियेचा खर्च जादा आणि मालाला भाव नाही, अशा अवस्थेत त्याच्यापुढे आत्महत्येशिवाय पर्याय उरत नाही. त्यामुळे जोपर्यंत शेतमालाला हमीभाव मिळणार नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होणार नाहीत, असे मत ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी व्यक्त केले.

नाम फाऊंडेशन आणि माय विश्व डॉट कॉमतर्फे शेतकऱ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या मोबाईल ॲप्लिकेशन आणि वेबसाईटसंदर्भात माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत नाना पाटेकर बोलत होते.

ते म्हणाले, शेतात राजा असणारा शेतकरी बाजारात हताश, हतबल होतो. शेतकऱ्यांसाठी खूप योजना आहेत; परंतु त्या त्याच्यापर्यंत पोहोचतच नाहीत. शेतमाल सोडून इतर सर्व वस्तूंना निश्चित किंमत आहे, मग शेतकऱ्यालाच तुम्ही वाऱ्यावर का सोडले? त्याला व्यापाऱ्याकडे जावेच लागणार नाही अशी व्यवस्था का निर्माण करू शकत नाही. माझा व्यापाऱ्यांना विरोध नाही; परंतु त्यांनी शेतकऱ्यांच्या मालाची वाजवी किंमत द्यावी. एवढीच शेतकऱ्यांची मागणी आहे, हे त्यांनी लक्षात घ्यावे, असे नाना पाटेकर म्हणाले.



## जातीचा कॉलम काढून टाकूया

▪ नगरमधील अल्पवयीन मुलीच्या हत्या प्रकरणाला जातीय रंग देण्याच्या मी विरोधात आहे. जात हा कॉलमच आपल्या आयुष्यातून काढून टाकला पाहिजे. हिंदुस्थानी हीच आपली पहिली आणि अंतिम जात असली पाहिजे. अशा घटना रोखण्यासाठी तरुण मुलांनी आणि मुलींनी पुढाकार घेतला पाहिजे. आत्मसंरक्षण करताना आपल्या हातून एखाद्याचा खून झाला तरी कायदा तुमचे काही करू शकत नाही, हे मुलींनी लक्षात ठेवले पाहिजे. असेही नाना पाटेकर यांनी यावेळी सांगितले.